झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड
क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा /सप्रा-१/२९१८ /२०२४
दिनांक : १८/१२/२०२४

# झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम अधिसूचना )**

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि.३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील सि.स.नं. ९६२ क्षेत्र ४७१.६० चौ.मी हे क्षेत्र पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे तसेच अनुसुचीमधील नमूद सि.स.नं.९६०,९६३ व ९६४, भवानी पेठ क्षेत्र २२८ चौ.मी. (झोपडपट्टी विरहीत) याचा समावेश करणे आवश्यक आहे. सदर मिळकती पैकी सि.स.नं.९६२ या मिळकतीचा झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश दि.२७/०२/२०२४ रोजी प्रसिद्ध केला असून सि.स.नं.९६०,९६३ व ९६४ या मिळकतीची (झोपडपट्टी विरहीत) झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत करण्याची पूर्वसूचना दि.०३/१०/२०२४ रोजी प्रसिद्ध करणेत आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करण्याची सि.स.नं.९६२ या मिळकतीची अंतिम अधिसूचना दि.०८/०३/२०२४ रोजीच्या दैनिक वृत्तपत्रामध्ये व दि. ७ ते १३ मार्च २०२४ रोजीच्या शासन राजपत्रामध्ये प्रसिद्ध झाले आहे. तसेच सि.स.नं.९६०,९६३ व ९६४ या मिळकतीची पूर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक - पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, ऑक्टोंबर १७-२३, २०२४ पृष्ठ मध्ये क्र. ३८-३९ तसेच दि.०४/१०/२०२४ रोजीच्या दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पूर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष योजनाक्षेत्रामधील/ झोपडपट्टीमधील जागेवर डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि

ज्याअर्थी, उपरोक्त आदेशास आक्षेप/ हरकती/ सूचना/ दावे आणि पुरावे प्राप्त न झालेने उपरोक्त नमुद बाबी विचारात घेऊन, खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्राच्या बाबतीत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री पटली आहे;

त्याअर्थी, मी नीलेश गटणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) मधील नमूद तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये सदरचा झोपडपट्टी पुनर्वसन आदेश कायम करून खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र (झोपडपट्टी विरहीत) म्हणून घोषीत करीत आहे;

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (२) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार

निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल आणि अशा अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३(क) नुसार अधिसूचना**

**अनुसूची**

**झोपडपट्टीचे नाव** :- सि.स.नं.९६०,९६२,९६३ व ९६४,भवानी पेठ, पुणे

**महानगरपालिका क्षेत्र** : पुणे

| पेठ | अंतिम भूखंड क्र. | अंतिम अधिसूचित क्षेत्र (चौ.मी.) | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| भवानी पेठ | सि.स.नं. ९६२ | ४७१.६० चौ.मी. | सरकारी | **पुर्वेस** - लागु न.भु.क्र.९६१,९६३,९६४ व लागु रस्ता<br>**दक्षिणेस** - लागु न.भु.क्र.९६८.<br>**पश्चिमेस** –लागु न.भु.क्र.९६९,९७०,९७३, ९७४.<br>**उत्तरेस** - लागु न.भु.क्र.९६० व ९७९. | दि.२७/०२/२०२४ रोजीच्या आदेशान्वये घोषीत केलेल क्षेत्र. |
| | सि.स.नं. ९६०,९६३ व ९६४ | २२८.०० चौ.मी. | खाजगी | **पुर्वेस** - लागु न.भु.क्र. ९६२ पै. व लागु रस्ता.<br>**दक्षिणेस** - लागु न.भु.क्र.९६२पै.व लागू बोळ.<br>**पश्चिमेस** – लागु न.भु.क्र.९६२ पै.<br>**उत्तरेस** - लागु न.भु.क्र.९७९ व ९६२ पै. | दि.०३/१०/२०२४ रोजी पूर्वसूचना प्रसिद्ध केलेले क्षेत्र. |
| **एकूण** | सि.स.नं.९६०,९६२,९६३ व ९६४ | ६९९.६० चौ.मी. | वरील प्रमाणे | **पुर्वेस** - लागु ६मीटर रस्ता व न.भु.क्र.९६१<br>**दक्षिणेस** - लागु न.भु.क्र.९६८ व ९६५.<br>**पश्चिमेस** –लागु न.भु.क्र.९७०,९७३, ९७४.<br>**उत्तरेस** - लागु न.भु.क्र.९६१ व ९७९. | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

**स्थळ** :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

**दिनांक** :- / /२०२४

**नीलेश गटणे** (भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

**प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी**

१. मा.जिल्हाधिकारी, पुणे जिल्हा, पुणे-०१ यांना माहितीस्तव व पुढील उचित कार्यवाहीस्तव सादर.
२. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना माहितीस्तव व पुढील उचित कार्यवाहीस्तव सादर.
३. विकसक मे.प्राईड अमन असोसिएट्स, पुणे.